Remove Watermark Wondershare PDFelement

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या दहा अभ्यास मंडळाच्या आज दि. ११ एप्रिल रोजी बैठका झाल्या. यामध्ये सात अभ्यास मंडळाचे अध्यक्ष बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले तर तीन तदर्थ अध्यक्ष जाहीर करण्यात आले.

विद्यापीठात सकाळी या अभ्यास मंडळाची बैठक झाली. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी सर्व अभ्यास मंडळाच्या सदस्यांना मार्गदर्शन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथ कुलसचिव डॉ. विनोद पाटील, निवडणूक विभागप्रमुख इंजि. आर. आय. पाटील, डॉ. मुनाफ शेख, राजेश ठाकरे, प्रवीण चंदनकर, आधार कोळी आणि निवडणूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. अभ्यास मंडळाचे बिनविरोध अध्यक्ष पुढीलप्रमाणे...

**मानव्यविद्या शाखा :-**

१) मराठी – डॉ. किशोर सोनवणे (महात्मा गांधी महाविद्यालय, चोपडा), २) हिंदी – डॉ. संजयकुमार शर्मा (कला व वाणिज्य महाविद्यालय, तळोदा), ३) इंग्रजी – डॉ. भूपेंद्र केसूर (मु. जे. महाविद्यालय, जळगाव), ४) इतिहास – डॉ. प्रशांत देशमुख (गरूड महाविद्यालय, शेंदूर्णी), ५) मानसशास्त्र – प्रा. चंद्रमणी लभाणे (मु. जे. महाविद्यालय, जळगाव), ६) अर्थशास्त्र – डॉ. जितेंद्र तलवारे (एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालय, धुळे)

**आंतरविद्या शाखा :-**

१) शिक्षणशास्त्र – डॉ. हेमंतकुमार देवरे (धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे), २) समाजशास्त्र – तदर्थ अध्यक्ष प्रा. अरविंद पाटील (कला व वाणिज्य महाविद्यालय, सोनगीर), ३) संरक्षणशास्त्र – तदर्थ अध्यक्ष डॉ. कन्हैयालाल पाटील (एच. आर. पटेल महाविद्यालय, शिरपूर), ४) राज्यशास्त्र – तदर्थ अध्यक्ष डॉ. विजय तुंटे (प्रताप महाविद्यालय, अमळनेर).

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ११ (प्रतिनिधी) राष्ट्रीय सेवा योजना आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच युनिसेफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ व १९ एप्रिल रोजी मुंबईत होणा-या राज्यस्तरीय युवा संसदेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सहा राष्ट्रीय स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्रातून ७८ राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. दि. १८ व १९ एप्रिल रोजी होणा-या या युवा संसदेत लोकसभा सभापती, विरोधी पक्षनेता, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, आदिवासी विकास मंत्री, पर्यावरण आणि वन्यजीव मंत्री या पदांसाठी विद्यापीठाचे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उभे आहेत. त्यासाठी ऑनलाईन प्रचार सुरू आहे. या युवा संसदेची रचना लोकसभा सभापती, पंतप्रधान, विरोधी पक्षनेता, वीसमंत्री, चार सचिव आणि एकावन्न खासदार अशी राहणार आहे. या युवा संसदेसाठी १) डिगंबर कुंभार (किसान महाविद्यालय, पारोळा), २) चंचल धांडे (मु. जे. महाविद्यालय, जळगाव), ३) डिंम्पल पाटील (एसएसपीव्हीएस डॉ. पी. आर. घोगरे महाविद्यालय, धुळे), ४) वासुदेव पाटील (आर. सी. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर), ५) प्रितम निकम (एनटीव्हीएस विधी महाविद्यालय, नंदुरबार), ६) गायत्री पाटील (जी टी पाटील महाविद्यालय, नंदुरबार) हे सहा विद्यार्थी सहभागी झाले आहेत. अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

Wondershare PDFelement